मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# शहरातील खड्डे चार दिवसात बुजवा : खासदार श्रीरंग बारणे

## वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी पोलीस तैनात करा : खासदार श्रीरंग बारणे यांच्या अधिकाऱ्यांना सूचना

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड शहरातील सर्वच भागातील प्रमुख रस्त्यावर खड्डे पडले आहेत. या खड्डयामुळे वाहतूक संथ होत असून नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत शहरातील रस्त्यांवरील खड्डे चार दिवसात बुजविण्याचे आदेश शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी महापालिका प्रशासनाला दिले. वाहतूक कोंडी होणा-या 'स्पॉट'वर, चौकांमध्ये वाहतूक पोलीस तैनात करण्याच्या सूचनाही पोलिसांना दिल्या.

पिंपरी-चिंचवड शहरातील रस्त्यावरील खड्डे आणि वाहतूक कोंडी संदर्भात खासदार बारणे यांनी शनिवारी (दि.3) महापालिका अधिकारी, पोलिसांची एकत्रित बैठक घेतली. महापालिका आयुक्त शेखर सिंह, वाहतूक पोलीस उपायुक्त विशाल गायकवाड, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त चंद्रकांत इंदलकर, शहर अभियंता मकरंद निकम, सह शहर अभियंता ज्ञानदेव जुंधारे, प्रमोद ओंभासे, कार्यकारी अभियंता बापू गायकवाड, प्रेरणा शंकर, देवण्णा गट्टूवार, सहायक पोलीस आयुक्त सतीश कसबे, निगडीचे वाहतूक पोलीस निरीक्षक शंकर बाबर, वाकडचे सुनील पिंजन, वाहतूक सल्लागार प्रताप भोसले यावेळी उपस्थित होते.



### शहरात कच-याचे साम्राज्य

» यांत्रिकी पद्धतीने रस्ते सफाई होत नाही. या ठेकेदाराकडून काम केले जात नाही. ठिकठिकाणी कच-याचे ढिग साचले आहेत. रस्त्याच्या कडेला कचरा, माती साचली आहे. याकडे प्रशासनाचे लक्ष नाही. कच-यामुळे दुर्गंधी पसरली आहे. अस्वच्छतेमुळे साथीचे आजारही वाढत आहेत. त्यामुळे शहरात साफसफाई ठेवावी. कोठेही कचरा साचणार नाही, याची काळजी घेण्याचे निर्देशही खासदार बारणे यांनी अधिका-यांना दिले.

### खासगी ट्रॅव्हलसाठी जागा निश्चित करा

» शहराची लोकसंख्या 27 लाखाच्या घरात गेली आहे. खासगी ट्रॅव्हलने प्रवास ही नागरिकांची गरज झाली आहे. या ट्रॅव्हल रस्त्यावर उभ्या राहत असल्यानेही वाहतूक कोंडीत भर पडते. त्यासाठी ज्या भागात ट्रॅव्हल थांबतात. त्या भागात महापालिकेने ट्रॅव्हलसाठी वाहनतळाची सुविधा उपलब्ध करावी. त्याचे शुल्क ट्रॅव्हल व्यावसायिकांकडून वसूल करावे. पिंपरीतील एच.ए मैदान, निगडी, प्राधिकरणात वाहनतळाची व्यवस्था निर्माण करावी, अशी सूचनाही खासदार बारणे यांनी केली.

" शहरातील वाहतूक कोंडीने नागरिक त्रस्त आहेत. सतत पडणा-या पावसामुळे रस्त्यावर खड्डे पडले आहेत. हे खड्डे तीन दिवसात बुजविण्याचे निर्देश प्रशासनाला दिले आहेत. शहरात कोठेही कचरा साचणार नाही, याची खबरदारी घेण्यास सांगितले आहेत. वाहतूक कोंडी होणारी ठिकाणी निश्चित करावीत. तिथे पोलीस तैनात करावेत अशा सूचना पोलिसांना दिल्या आहेत. याबाबत 15 दिवसांनी पुन्हा आढावा घेणार आहे.

- श्रीरंग बारणे, खासदार, मावळ लोकसभा.

# पिंपरी - चिंचवड कार्यक्षेत्रात डेंग्यूचे 46, चिकुनगुण्या 5, झिकाचे 2 रुग्ण

## पावसाळयाच्या दिवसामध्ये काळजी घेणे आवश्यक, महानगरपालिकेने "डेंग्यु मुक्त पीसीएमसी" मोहिमेची सुरुवात केलेली आहे

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी -चिंचवड कार्यक्षेत्रात डेंग्यू आजाराचे 46 रुग्णचिकुनगुण्या आजाराचे 5 रुग्ण व झिका आजाराचे 2 रुग्ण आहेत. झिका आजाराचे दोन्ही रुग्ण खासगी रुग्णालयामध्ये भरती असून दोघांची प्रकृती स्थीर आहे.

हिवताप, डेंग्यु, चिकुनगुण्या, झिका या आजारांच्या साथीचा प्रादुर्भाव वाढू नये याकरीता पावसाळयाच्या दिवसामध्ये काळजी घेणे आवश्यक आहे. महानगरपालिकेने " डेंग्यु मुक्त पीसीएमसी(" मोहिमेची सुरुवात केलेली आहे. त्यानुषंगाने सदर मोहिमेअंतर्गत "ब " क्षेत्रिय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रामध्ये हिवताप, डेंग्यु व चिकुनगुण्या या किटकजन्य आजारांच्या प्रतिबंधात्मक कार्यवाही कामी जनजागृती मोहिमेचे शनिवारी "ब" क्षेत्रिय कार्यालय, चिंचवड यांच्या संयुक्त विद्यमाने जिजाऊ पर्यटन केंद्राशेजारील वाहनतळ परिसर, चिंचवडगांव येथे आयोजन करण्यात आले होते.

जनजागृती मोहिमेत आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ.लक्ष्मण गोफणे, अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ.अभयचंद्र दादेवार, सहाय्यक आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ.किशोरी नलावडे, वैद्यकीय विभागातील जेष्ठ वैद्यकीय अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, ए.एन. एम. व आशा स्वयंसेविका, ब" क्षेत्रिय कार्यालय व आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.




### वैद्यकीय विभागामार्फत नागरिकांना आवाहन

» महानगरपालिकेतर्फे डेंग्यू व झिका रुग्णांच्या आजूबाजूच्या परिसरात सर्वेक्षण करण्यात येत आहे. तसेच महानगरपालिका वैद्यकीय विभागामार्फत नागरिकांना आवाहन करण्यात येते कि, डेंग्यू किंवा झिका सदृश लक्षणे आढळल्यास त्वरित वैद्यकीय तज्ञांना दाखवून सल्ला घ्यावा, असे आवाहन डॉ. गोफणे यांनी केले.

### सर्व्हेक्षणासाठी पथकाची नियुक्ती

» . झिका रुग्ण परिसरात वैद्यकीय विभागामार्फत सर्व्हेक्षणासाठी पथकाची नियुक्ती करण्यात आलेली आहे. सदर पथकामार्फत या परिसरात ताप सर्व्हेक्षण, कंटेनर सर्व्हेक्षण, गरोदर माता सर्व्हेक्षण करण्यात येत असून नागरिकांना किटकजन्य आजाराविषयी माहिती सांगून जनजागृती करण्यात येत आहे.

# अमित शाह म्हणजे अब्दालीचा राजकीय वंशज : उद्धव ठाकरे

## शिवसैनिकांच्या संकल्प मेळाव्यातून पुन्हा भारतीय जनता पक्षावर उद्धव ठाकरे यांनी हल्लाबोल केला

**पुणे | प्रतिनिधी**

"तुम्ही काय करता. तुमचे पूर्वज काढा, 1940 पासून. श्यामाप्रसाद मुखर्जी, तेव्हाच्या मुस्लिम लीगने देशाची फाळणी मागितली. त्यांच्यासोबत मांडीला मांडू लावून बंगालमध्ये सत्ता स्थापन करणारे यांचे राजकीय बाप श्यामाप्रसाद मुखर्जी" अशी घणाघाती टीका उद्धव ठाकरे यांनी केली.

“शाहिस्तेखान हुशार होता. त्याचं बोटावर निभावलं. पुन्हा महाराष्ट्रात आला नाही. हे परत आले. त्यांनी शहाणपण घेतला नाही. महाराष्ट्राने जे फटके दिले त्याचे वळ कुठे कुठे उठले ते पाहण्यासाठी आले होते. त्यांचे मोहरके आले. अहमद शहा अब्दालीचा राजकीय वंशज अमित शाह आला होता. तोही शाहच होता. तो अहमद शाह होता हा अमित शाह आहे. तो वळवळायला आला होता. आम्हाला हिंदुत्व शिकवता. तुम्ही नवाज शरीफची केक खाणारी औलाद तुमच्याकडून आम्ही हिंदुत्व शिकायचं" अशी घणाघाती टीका उद्धव ठाकरे यांनी केली. ते पुणे येथे पक्षाच्या मेळाव्यात बोलत होते.

“तुम्ही विश्वासघात केला. विश्वासघात करणारा हिंदू असू शकत नाही, असं शंकराचार्य म्हणाले. तुम्ही काय करता. तुमचे पूर्वज काढा, 1940 पासून. श्यामाप्रसाद मुखर्जी, तेव्हाच्या मुस्लिम लीगने देशाची फाळणी मागितली. त्यांच्यासोबत मांडीला मांडू लावून बंगालमध्ये सत्ता स्थापन करणारे यांचे राजकीय बाप श्यामाप्रसाद मुखर्जी. मेहबुबा मुफ्ती यांच्यासोबत भाजपने सरकार केलं. चंद्राबाबू नायडू हा काय हिंदुत्ववादी माणूस आहे,. नितीश कुमार हा काय हिंदुत्ववादी आहे. त्यांच्याकडे डोळेझाक केली जाते. आणि आम्हाला हिंदुत्वाचं विचारता. तुमचं काय आहे ते सांगा?” असा सवाल उद्धव ठाकरे यांनी भाजपाला विचारला.




### ...एवढ्या कुवतीचा तू नाहीच

» बऱ्याच वर्षानंतर मी पुण्यात तुमच्यासमोर येतोय. आज मला जाहीर सभा घ्यायची होती. आता लढाई मैदानात होणार आहे. हॉलमध्ये होणार नाही. मी परवा शिवसैनिकांसमोर मी बोललो. एक तर तू राहशील किंवा मी राहील. त्यानंतर माझ्या पायाशी कलिंगड ठेवले गेले. काही जणांना वाटले मी त्यांना आव्हान दिले. पण मी ढेकणांना आव्हान देत नाही. मी म्हणजे कोण आणि तू म्हणजे कोण. मी म्हणजे संस्कारीत महाराष्ट्र आणि तू म्हणजे महाराष्ट्रावर दरोडे टाकणारा पक्ष. मी ढेकणाला आव्हान देत नाही. ढेकणाला बोटाने चिरडले जात आहे. त्यानंतर ते म्हणाले, माझ्या नादाला लागू नका. अरे तुझ्या नादाला लागण्या एवढ्या कुवतीचा तू नाहीच आहेस.

### 'हे आमचं पाप होतं'

» “संसद गळत आहे, ज्याने संसद बांधली. तोच या नदीवर काम करत आहे. कंत्राटदार माझा लाडका सुरू आहे. तोही गुजरातचा आहे. वर्षही झालं नाही संसद बांधून. ती गळायला लागली. मोदी काँग्रेसकडे 70 वर्षांचा हिशोब मागत आहेत. 70 वर्षात काय केलं. तुमने क्या किया विचारत आहात. ते काय विचारता. तुम्ही 12 महिन्यापूर्वी बांधललेली संसद गळत आहे. राम मंदिर गळत आहे. पेपर लिक होत आहे. त्याचा हिशोब द्या. मग काँग्रेसला विचारा. हे गळती सरकार आहे. आम्ही यांना पाठिंबा दिला होता. हे आमचं पाप होतं” असं उद्धव ठाकरे म्हणाले.

### नद्यांचा प्रवाह बंद केला जात आहे...

» पुण्यात मुळा मुठा नदी आहे. त्याबाबत व्यंकय्या नायडू आले होते. त्यांनी मुळा मुठा हे काय नाव आहे. व्यंकय्या नाव ठेवायचं का की मोदी नदी म्हणायचे का?. त्यांनी नद्यांची नावे बदलायला सांगितली. नावं तर बदलू शकत नाही. पण त्यांनी प्रवाह बदलला. पुण्यात नाईक बेट आहे. या नाईक बेटाचे दोन्ही बाजूने प्रवाह बंद केला. प्रवाह बंद करून घरे बांधली. मग नदी का घुसणार नाही इकडे तिकडे. मला पुण्याचा शाश्वत विकास करायचा आहे.

# ‘पूरग्रस्त भागात तातडीनं भिंत बांधावी’; मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आदेश

## जिल्हाधिकारी, पुणे महानगरपालिका, जलसंपदा विभाग यांनी समन्वयाने तज्ज्ञांच्या सल्ल्याने एक आराखडा तयार करावा

**पुणे | प्रतिनिधी**

मागील आठवड्यात खडकवासला धरणातून मुठा नदीत सोडण्यात आलेल्या पाण्यामुळे सिंहगड रस्त्यावरील एकता नगरी परिसरातील विठ्ठलवाडी, निंबजनगर भागात पूरस्थिती उद्भवली होती. या पूरामुळे जवळपास दिडशेंहून अधिक घरांमध्ये पाणी घुसले होते. या भागात पुन्हा पूर स्थिती उद्भवू नये यासाठी तातडीनं पूर संरक्षक मजबूत भिंत बांधणे सुरु करण्याचे आदेश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शनिवारी दिले.

तसेच निळ्या पूर रेषेतील (ब्लू) लाईन) नागरिकांचे कायमस्वरूपी पूनर्वसन करण्यासाठी जिल्हाधिकारी, पुणे महानगरपालिका, जलसंपदा विभाग यांनी समन्वयाने तज्ज्ञांच्या सल्ल्याने एक आराखडा तयार करावा, असे आदेशही मुख्यमंत्री शिंदे यांनी दिले आहेत. याठिकाणी एफएसआय मिळत नसल्याने विकासक पुनर्विकासासाठी पुढे येत नाहीत, असे त्यांनी निदर्शनास आणले. मुख्यमंत्र्यांनी यावर याठिकाणी विशेष दर्जा देऊन पुनर्विकासाचे काम करावे. तसेच तसा आराखडा तयार करावा, असे निर्देशही त्यांनी दिले आहेत.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली एका शिष्टमंडळाने वर्षा येथे मुख्यमंत्र्यांची भेट घेतली. त्यावेळी त्यांनी पुणे जिल्हाधिकारी यांना हे निर्देश दिले. मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव ब्रिजेश सिंह, तसेच इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



### वाहनांची नुकसान भरपाई द्या

» पूर परिस्थितीत पुण्यातील वाहनांचे मोठे नुकसान झाले. पण नियमांमुळे नुकसान भरपाई मिळत नाही असे यावेळी मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून देण्यात आले. मुख्यमंत्र्यांनी यावर पुणे पालिका आयुक्त व जिल्हाधिकाऱ्यांना विमा कंपन्यांशी एकत्रितपणे बोलून यावर मार्ग काढण्यास आणि तातडीने वाहनधारकांना नुकसान भरपाई मिळावी अशा सूचना केल्या आहेत.

### कायमस्वरूपी पुनर्वसन करावे

» एकतानगर, सिंहगड याठिकाणी निळ्या पूर रेषेत सुमारे 3 लाख घरे असून ती अनेक वर्षांपासून आहेत अशी माहिती पालिका आयुक्तांनी दिली. याठिकाणी एफएसआय मिळत नसल्याने विकासक पुनर्विकासासाठी पुढे येत नाहीत, असे त्यांनी निदर्शनास आणले. मुख्यमंत्र्यांनी यावर याठिकाणी विशेष दर्जा देऊन पुनर्विकासाचे काम करावे. तसेच तसा आराखडा तयार करावा, असे निर्देशही त्यांनी दिले आहेत.

# पूर ओसरला पण पंचनामे सुरूच ; यंत्रणा नुकसानग्रस्तांपर्यंत पोहोचण्यात अपयशी

## नदीकिनारी असणारी घरे अनेक सखल भागातही पाणी शिरले असून सखल भागातील रहिवाशांची घरे पाण्याखाली गेली होती

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहराला गेल्या आठवड्यात पावसाचा मोठा तडाखा बसला होता. यामध्ये केवळ नदीकिनारी असणारी घरे नव्हे तर, अनेक सखल भागातही पाणी शिरले असून सखल भागातील रहिवाशांची घरे पाण्याखाली गेली होती. काहींना दोन दिवस तर, काहींना चार दिवस घराबाहेर काढावी लागली होती. दरम्यान, पिंपरी-चिंचवड शहरात जवळपास दहा हजारांहून अधिक नागरिकांचे नुकसान झाले आहे. मात्र प्रत्यक्षात केवळ ७ हजार ५१९ नुकसानग्रस्तांचे पंचनामे केले आहेत. ही तफावत मोठी असल्याने अनेक रहिवासी नुकसानभरपाईपासून वंचित राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे अनेक नुकसानग्रस्तांपर्यंत तहसील कार्यालयाची कर्मचारी पोहोचलेच नसल्याचे दिसून येते.

संततधर पाऊस आणि नदी नाले भरून वाहू लागल्याने शहरातील नवी सांगवी, कासारवाडी, चिंचवड, पिंपरी गावठाण, गणेशनगर, रावेत, साने चौक, लांडेवाडी या प्रमुख ठिकाणी मोठ्या प्रमाणात पाणी शिरले होते. दरम्यान यापैकी काही ठिकाणी स्थानिक रहिवाशांच्या घरात देखील पाणी शिरल्याने त्यांना चार ते पाच दिवस बाहेर काढावे लागले. परिणामी, या रहिवाशांचे मोठ्या प्रमाणात हाल झाले. दुसरीकडे महापालिका आणि आपत्ती व्यवस्थापन यांच्या मदत मिळाल्याने दिलासा मिळाला. मात्र, पाच ते सहा दिवस उलटूनही नुकसानभरपाई बाबत कोणतीही माहिती त्यांच्यापर्यंत पोहोचली नाही. तलाठी, महसूल कर्मचाऱ्यांनी स्वतः त्या-त्या ठिकाणी पाहणी केली. त्याप्रमाणे पंचनामेही केले. मात्र, अजूनपर्यंत ते पंचनामे सुरू असून, बहुतांश रहिवासी वंचित राहण्याची शक्यता आहे.



### कार्यालयात आकडेवारी उपलब्ध नाही

» पिंपरी-चिंचवड शहर अंतर्गत अप्पर तहसीलदार कार्यालय आहे. यामध्ये चिंचवड, मोशी, निगडी, देहू आणि भोसरी या मंडळ अधिकाऱ्यांमार्फत जवळपास ३२ गावांचे काम चालते. त्यासाठी आठ तहसीलदार कार्यालयात आहेत. मात्र, प्रत्येक विभागनिहाय माहिती तहसील कार्यामध्ये उपलब्ध नाही. त्यामुळे या नुकसानग्रस्त नागरिकांना न्याय कसा मिळणार, असा प्रश्न नागरिकांना पडला आहे.

### ...तर मग आमच्याकडे कोण पाहणार

» शहरातील विविध ठिकाणी पंचनामे झाले आहेत. मात्र त्या ठिकाणी राजकीय दबाव आणि नागरिकांच्या तक्रारीनंतर पंचनामे झाले आहेत. प्रत्यक्षात दापोडी, तळवडे, पिंपरी या ठिकाणच्या नुकसानग्रस्तांपर्यंत पंचानाम्यांची यंत्रणाच पोहोचली नाही. त्यामुळे आमची राजकीय ओळख नसल्याने आमच्याकडे कोण पाहणार, असा प्रश्न स्थानिकांनी उपस्थित केला आहे.

### सर्वाधिक पंचनामे पिंपरीत

» पिंपरी परिसरातील जवळपास साडेचार हजारापर्यंत पंचनामे पूर्ण झाले आहेत. मात्र, त्या पंचनाम्यांच्या फायलींचे काम सुरू असल्याने नेमका आकडा सांगता येत नाही, असे मंडलाधिकारी सुरेंद्र जाधव यांनी सांगितले. एकूण पंचनाम्यांपैकी पिंपरी परिसरात सर्वाधिक नुकसान झाले आहे. तरीही अद्याप काही ठिकाणी महसूल विभाग पोहोचला नसल्याचे जाधव म्हणाले आहेत.

याबाबत नुकसानग्रस्त स्थानिक नागरिकांनी तलाठी कार्यालय, तहसील कार्यालय या ठिकाणी जाऊन विचारणाही केली. मात्र तुमची माहितीच आमच्या कर्मचाऱ्यांकडून आली नसल्याचे सांगत त्यांना परत पाठवण्यात आले. त्यामुळे नेमकी मदत मागायची कुणाकडे, असा प्रश्न यांना पडला आहे.

तर काही नुकसानग्रस्तांनी, सरकारी कर्मचारी आमच्यापर्यंत आलेच नसल्याचे सांगितले. गत शनिवारी आणि रविवारी महसूल विभागाने दिवसभर काम केले, असे सांगितले. मात्र प्रत्यक्षात नुकसानग्रस्त नागरिकांपर्यंत हा विभाग पोहोचलाच नसल्याचे निदर्शनास आले आहे. पूर ओसरल्यानंतर पिंपरी-चिंचवड महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी आणि मंडल अधिकारी, तलाठी यांच्या मदतीने नुकसानग्रस्त पंचनामे सुरू आहेत. मात्र, पाच दिवस उलटूनही ते पूर्ण झाले नसल्याचे दिसले.

# शहरात स्कूलबस अपघाताच्या पार्श्वभूमीवर आरटीओ साधणार स्कूलचालकांशी संवाद

## आरटीओ विभागाने कार्यवाही सुरु केली नियमबाह्य व अनफिट बसचालकांची तपासणी करून कारवाई करण्यात येणार आहे

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरात स्कूलबस अपघाताच्या पार्श्वभूमीवर आरटीओ विभागाने कार्यवाही सुरू केली आहे. एकीकडे नियमबाह्य व अनफिट बसचालकांची तपासणी करून कारवाई करण्यात येणार आहे, तर दुसरीकडे शाळा प्रशासनाशी संवाद साधून त्याबाबतच्या सूचना दिल्या आहेत. जवळपास ८०० हून अधिक

स्कूलचालकांना ईमेलद्वारे शालेय परिवहन समिती स्थापन करण्याबाबत कळवले आहे. त्याचप्रमाणे ग्रामीण भागात देखील येत्या काळात ड्राईव्ह घेण्यात येणार आहे.

दरम्यान, 'सीविक मिरर'ने 'स्कूल बस अपघातानंतरही आरटीओ निद्रिस्त' या मथळ्याखाली वृत्त प्रसिद्ध झाले होते. त्यामध्ये आरटीओच्या वतीने स्कूलबसची तपासणी वाढवण्याबाबत अधोरेखित केले होते. या वृत्ताची दाखल घेत आरटीओच्या वतीने पुढाकार घेऊन स्कूलचालकांशी संवाद चालू साधला जाणार आहे. जेणेकरून स्कूल बसचालकांसह सर्वांचेच प्रश्न समजून घेता येतील.

क्षमतेपेक्षा अधिक विद्यार्थ्यांची वाहतूक करणे, वाहतूक नियमांचे पालन न करणे, वाहनयोग्यता तपासणी न करणे, यासह अनेक कारणांमुळे स्कूल बसच्या अपघातांचे प्रमाण पिंपरी-चिंचवड शहरात वाढले आहे.



### खासगी शाळा प्रशासनाचे दुर्लक्ष

» पिंपरी-चिंचवड शहरातील खासगी शाळेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना ने-आण करण्यासाठी वाहन पुरवले जाते. दरम्यान, संबंधित स्कूल बसचालकाची व्यवस्थित माहिती घेण्याचीच तसदी शाळा प्रशासन घेत नाही. त्याचप्रमाणे पालकांच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर त्यावर कोणती कारवाई होत नसल्याने अशा बेजबाबदार स्कूल बसचालकांचे फावत आहे.

" जून आणि जुलै महिन्यात आम्ही ३०० स्कूल बसची तपासणी केली. दोषी चालकांवर कारवाई केली आहे. जिल्हास्तरावर आम्ही परिवहन समितीच्या बैठका घेणार आहोत. त्याचप्रमाणे शहर परिसरातील स्कूल मॅनेजमेंटला बैठक घेण्याचे कळवलेले आहे. आरटीओचे अधिकारीही तपासणी दरम्यान शाळेच्या संबंधित विभागाला सांगत आहेत.

**- संदेश चव्हाण, प्रादेशिक परिवहन अधिकारी, पिंपरी-चिंचवड**

# पुरंदर-हवेली विधानसभा मतदारसंघात बंडखोरीचे आव्हान!

## महायुतीत बिघाडी झाली तर पुरंदर-हवेलीत चौरंगी-पंचरंगी निवडणूक रंगण्याची शक्यता असून बंडखोरीचे आव्हान ही असण्याची शक्यता

**पुणे | प्रतिनिधी**

पुरंदर-हवेली विधानसभा मतदारसंघासाठी महाविकास आघाडी विरुद्ध महायुती अशी लढत प्रामुख्याने होणार असल्याचे चित्र स्पष्ट असले तरी महायुती व महाविकास आघाडीमध्ये अनेक दिग्गज उमेदवार असल्याने अनेक उमेदवारांची पुरंदरच्या विधानसभा क्षेत्रामध्ये उमेदवारी मिळवण्यासाठी धडपड सुरू आहे.

त्यामुळे आघाडी, महायुतीत बिघाडी झाली तर पुरंदर-हवेलीत चौरंगी-पंचरंगी निवडणूक रंगण्याची शक्यता असून बंडखोरीचे आव्हान ही असण्याची शक्यता राजकीय वर्तुळात रंगली आहे.

राज्यामध्ये महाविकास आघाडीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे, कॉंग्रेस, आम आदमी पार्टी असे घटक पक्ष आहेत. तर महायुतीमध्ये भारतीय जनता पार्टी, शिवसेना शिंदे गट, राष्ट्रवादी अजित पवार गट यांच्यासह रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया असे घटक पक्ष एकत्र आहेत.

नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये हे सर्व पक्ष एकसंघ असताना देखील खासदार सुप्रिया सुळे यांना आघाडी मिळाली होती यामुळे महाविकास आघाडीमध्ये एक नवचैतन्याचे वातावरण आहे. तर महायुतीमध्ये अनेक दिग्गज उमेदवार असल्याने उमेदवारीसाठी मोठी रस्सीखेच होणार आहे.

महाविकास आघाडीकडून काँग्रेसचे आमदार संजय जगताप तर राष्ट्रवादी शरदचंद्र पक्षाकडून संभाजी झेंडे यांची नावे सध्या चर्चेमध्ये आहेत. तर भाजपकडून माजी आमदार अशोक टेकवडे, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष जालिंदर कामठे, शिवसेना विजय शिवतारे यांची नावे सध्या चर्चेत आहेत.

पुरंदर-हवेलीचे आमदार संजय जगताप यांचा विविध विकासकामांच्या माध्यमातून मोठा जनसंपर्क असून त्यांच्यासाठी ही निवडणूक प्रतिष्ठेची असणार आहेत.

तर भाजपकडून पुरंदर-हवेलीचे माजी आमदार अशोक टेकवडे यांचा मोठा जनसंपर्क आहे. तर माजी जिल्हा परिषदेचे अध्यक्ष जालिंदर कामठे यांनी देखील आपल्या जिल्हा परिषदेच्या कार्यकाळातून जनतेशी जवळी ठेवली आहे. त्यामुळे त्यांचे नाव देखील सध्या जोरदार आहेत.




### विश्‍वासालाच यंदा आव्हान?

» दत्ता झुरंगे हे सुरवातीला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये होते. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून कोणतीही उमेदवारी मिळणार नसल्याची खात्री झाल्यानंतर झुरंगे यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश करून आमदार संजय जगताप यांचा विश्वास संपादित केला. या नंतर ते पंचायत समिती सदस्य, नंतर जिल्हा परिषद सदस्य झाले. मात्र आता आमदार संजय जगताप यांच्या विरोधातच त्यांनी विधानसभेसाठी दंड थोपटले असल्याचे पाहावयास मिळते.

### गुंजवणीचा मुद्दा तापणार

» विधानसभेच्या निवडणुका जवळ येत असल्याने विरोधक व सत्ताधारी यांच्याकडून पुरंदरच्या भावनांना हात घालत गुंजवणीचा मुद्दा ऐरणीवर आणला जात आहे. गुंजवणीचे पाणी व विमानतळ आम्ही करणार असे सत्ताधारी व विरोधकांकडून सांगितले जात आहे.

### संपूर्ण तालुक्यामध्ये फ्लेक्सबाजी

» राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा गटाकडून पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या माध्यमातून जनतेशी संपर्क ठेवणारे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष प्रा. डॉ दिगंबर दुर्गाडे हे देखील विधानसभेसाठी इच्छुक आहेत तर पुरंदर तालुक्यामध्ये नव्यानेच युवकांचा चेहरा म्हणून माजी जिल्हा परिषदेचे सदस्य दत्ता झुरंगे यांनी देखील तयारी सुरू केली असल्याचे पाहावयास मिळते तर पुरंदर व हवेली मतदारसंघांमध्ये अजित पवार यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने संपूर्ण तालुक्यामध्ये फ्लेक्सबाजीने झुरंगे यांनी चर्चेला उधाण आणले आहे.

# नवं पुणे की हडपसर...? पुण्याच्या पूर्व भागात पुन्हा नव्या पालिकेचे वारे

## पुण्याच्या महापालिकेचे विभाजन करून 'नवे पुणे' किंवा 'हडपसर-हवेली' अशी नवी महानगरपालिका स्थापन करण्याची मागणी

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे शहराचे उपनगर म्हणून वेगाने विकसित होणा-या पूर्व हवेलीतील लोणी काळभोर, उरुळी कांचन व वाघोली परिसराच्या विकासासाठी नवी मुंबईप्रमाणे नव्या पुण्याची आवश्यकता आहे. पुण्यासाठी स्वतंत्र महापालिकेचा विषय गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे.

गेल्या काही वर्षांत इचलकरंजी आणि जालना अशा दोन महापालिका नव्याने स्थापन झाल्या आहेत. पुण्याच्या महापालिकेचे विभाजन करून 'नवे पुणे' किंवा 'हडपसर-हवेली' अशी नवी महानगरपालिका स्थापन करण्याची गरज आहे.

राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी गेल्या आठवड्यात या संदर्भात आपली भूमिका मांडली. त्यामुळे हा विषय पुन्हा चर्चेत आला आहे. लोकसंख्येचा वाढता ताण ही पुण्यावरील भविष्यातील मोठी समस्या होऊ शकते. येत्या काळात हडपसर- हवेली ही स्वतंत्र महापालिका करण्याची गरज आहे. पवार यांच्या सुचनेमुळे नवीन महापालिकेची गरज अधोरेखित झाली आहे.

वाढत्या शहरीकरणामुळे पुणे महापालिकेच्या यंत्रणेवर प्रचंड ताण येत असल्याने नागरिकांना किमान प्राथमिक सुविधा पुरविण्यासही यंत्रणा अपयशी ठरत आहे. त्यात दोन वर्षांपासून एकही महापालिका अस्तित्वात नसल्याने सर्व कारभार राज्य सरकारच्या हाती आहे.




### दहा वर्षांपासून विषय प्रलंबित

» पुण्याच्या विकासामध्ये शरद पवार यांची भूमिका महत्त्वाची राहिली आहे. या पार्श्वभूमीवर पवार यांनी या भागासाठी स्वतंत्र महापालिकेची गरज अधोरेखित करून या विषयाला वाचा फोडली आहे. उरुळी देवाची आणि फुरसुंगी या दोन गावांसाठी नगर परिषद करण्याऐवजी पुण्याच्या पूर्वेकडील आणखी गावांचा समावेश करून स्वतंत्र महापालिका स्थापन करण्याची आवश्यकता नुकत्याच झालेल्या एका बैठकीत मांडण्यात आली. स्वतंत्र महापालिकेचा विषय दहा वर्षांपासून प्रलंबित असून त्याबाबत कोणताही निर्णय झाला नाही.

### नगरपरिषद तरी करा

»लोणी काळभोर, उरुळी कांचन व कदमवाकवस्ती या तीनही ग्रामपंचायतींच्या हद्दीत नगरपालिका किंवा नगर परिषद करावी, अशी मागणी शिरूर-हवेलीचे आमदार अशोक पवार यांनी यापूर्वी केली होती. या संदर्भात राज्य सरकारने तातडीने निर्णय घेण्याची गरज आहे. कुठल्याही ग्रामपंचायतीकडे विकासकामांसाठी निधीचा तुटवडा असतो. महानगरपालिका तयार झाल्यास विकासकामांसाठी जास्त निधी उपलब्ध होईल. त्यामुळे रस्ते, क्रीडांगण, पाणी पुरवठा, मल निस्सारण आदी गोष्टीवर खर्च करून एक सुनियोजित शहर वसवता येईल. त्यामुळे या संदर्भात राज्य सरकारने तातडीने निर्णय घेण्याची आवश्यकता आहे.